दादासाहेब फाळके पुरस्काराचे मानकरी स्वर्गीय गीतकार मजरुह सुलतानपुरी मुस्लीम असूनही होळीला आपला आवडता सण समजत असत. कारण हा सण म्हणजे बंधुभाव आणि एकात्मतेचं प्रतिक असल्याचं त्यांचं मत होतं. लखनौपासून मुंबईपर्यंत आणि हिंदी क्लिट्झचे संपादक मुनीश सक्सेना यांच्या अंगणातील होळीपासून आर.के. स्टुडिओतील ग्रेट शोमन राज कपूरच्या होलिकोत्सवापर्यंत होळीच्या अनेक रंगतदार आठवणी त्यांच्या स्मृतीकोशात कायम होत्या. होळीविषयी बोलताना त्यांचा कंठ दाटून यायचा. कारण त्यांच्यासमवेत होळी खेळणारे त्यांचे अनेक साथीदार एकेक करून सोडून गेले होते. हिंदी चित्रपटासाठी मजरुह यांनी स्वतः अनेक गीतं लिहिली. या होळीगीतांच्या लोकप्रियतेचं श्रेय जेवढं संगीतकार आणि गायकांना मिळतं आणि तेवढं गीतकारांना कधीच मिळत नाही याची खंत त्यांना नेहमी वाटत असे. एवढं असूनही मजरुहच नव्हे तर इतर गीतकारांच्या मनातून होळीचं प्रेम कधीच आटलं नाही. चित्रपटसृष्टीतील काही मान्यवर गीतकारांच्या दृष्टीतून होळीचं महत्त्व आणि होळी गीतांची ही झलक.



प्रसिद्ध आर.के. होळीत राज कपूर, शम्मी कपूर, रणधीर कपूरसह इतर



डेझी आणि गोपी कृष्ण यांना नाचताना पाहणारे राज कपूर

आनंद बक्षी

चित्रपटसृष्टीतील सर्वात बुजुर्ग संगीतकार समजल्या जाणाऱ्या आनंद बक्षी यांनी कुठल्याही गीतकारापेक्षा जास्त गीतं लिहिली असतील. *कटी पतंग*मधील 'खेलेंगे हम होली...'पासून *शोले*मधील 'होली के रंग में...'यासारखी अनेक अविस्मरणीय होळी गीतं त्यांच्या खात्यात जमा आहेत. त्यांनी शेवटचं होळीगीत *डर*साठी लिहिलं. त्यांचं असं म्हणणं आहे की, जुने निर्माते-दिग्दर्शक आपल्या चित्रपटात होळीचं एक सिच्युएशनल गीत जरूर ठेवायचे. या गीतांवर संगीतकारही विशेष मेहनत घ्यायचे. त्यामुळे ही होळीगीतं हमखास लोकप्रिय व्हायची. आता मात्र सणवारांचं महत्त्व पूर्वीसारखं राहिलेलं नाही. चित्रपटसृष्टीत राज कपूर यांच्या निधनानंतर सुभाष घई आणि अमिताभ बच्चन यांनी त्यांची होळीपरंपरा चालवण्याचा प्रयत्न केला. तो अयशस्वी ठरला. एकेकाळी आर.के.च्या होळीतील प्रसंग मला होळीगीताची कल्पना पुरवायचे. राज कपूर गेल्यावर चित्रपटसृष्टीतील होळीचे रंगच जणू हरवले. ते शोधून पुन्हा चित्रपटसृष्टीतील मंडळींना एकत्र आणणाऱ्या होळीचं कुणीतरी आयोजन करायला पाहिजे असं मनापासून वाटतं.

आनंद बक्षी यांनी होळीची असंख्य गीतं लिहिली असली तरी त्यांना पुन्हा आपल्या स्मृतीपटलावर आणून मनाला वेदना द्यायच्या नाहीत. त्यांच्या प्रत्येक होळीगीताशी काही ना काही आठवणी निगडीत आहेत. आपल्याला सोडून गेलेल्या मित्रांच्या आठवणींची संख्या त्यामध्ये जास्त आहे. विशेषतः संगीतकार लक्ष्मीकांत यांची होळीतील आठवण मनाला अधिक कातरते.


माया गोविंद


माया गोविंद या मूळच्या कवियित्री आहेत.

डरमध्ये शाहरूख खान



आनंद बक्षी लिखित *शोले* -
होली के रंग में...





हरीवंशराय बच्चन
लिखित *सिलसिलात* - रंग बरसे...

जावेद अख्तर लिखित *मशाल* - होली आयी देखो...

होळीच्या काळात त्यांच्याकडे अनेक कवीसंमेलनाचे प्रस्ताव येतात. होळीविषयी प्रतिक्रिया व्यक्त करताना त्या म्हणतात, 'मला होळीच्या रंगाची भिती वाटते. त्यामुळे मी होळीच्या दिवशी लोकांपासून चार हात दूर राहते. परंतु बंद खिडकीतून चोरून होळीचं दृश्य पाहणं मला खूप आवडतं. लोकांना होळी खेळताना पाहून मला होळीगीतं लिहिण्याची प्रेरणा मिळते. मी होळीवर अनेक कविता, गीतं आणि छंद लिहिलेत. *पायल की झंकार* या चित्रपटासाठी मी एक गीत लिहिलं होतं. 'सारी डार दमी मोवे रंग की डगर. मै तो धोकेसे देख न लागी उधर. ही माझी स्वतःची सर्वात आवडती रचना आहे. जुनी होळीगीतं अप्रतिम होती यात शंका नाही. 'आज न छोडेंगे बस हमजोली' हे गाणं माझं आवडतं होळीगीत आहे.

निदा फाजली

निदा फाजली हे गीतकारपेक्षा साहित्यिक म्हणूनच प्रसिद्ध आहेत. त्यामुळे फिल्मी होळीपेक्षा ते साहित्यातील होळीची अधिक चर्चा करतात. त्यांना कुठल्याही फिल्मी होळीगीतांपेक्षा नजीर अकबराबादीची होळीशी संबंधित शायरी आणि गीतं अधिक आवडतात. ते म्हणतात, 'मी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवलं तेव्हा होळीचे स्वरूप काही वेगळेच होते. तेव्हा नात्यानात्यांमध्ये कृत्रिमता नव्हती. होळीच्या रंगात प्रेम, सौहार्दाचे रंगही मिसळलेले असत. आजचे रंग दिसायला गडद असले तरी ते कृत्रिम असल्याचं स्पष्ट जाणवतं. आज होळीगीतं तर चित्रपटातून हद्दपारच झालीत. सगळ्याच सणांची बदललेली ओळख हा खरंतर चिंतनाचाच विषय आहे. मी किती चित्रपटांसाठी होळीगीतं लिहिली हे आता नेमकं आठवत नाही. मला शकिल बदायुनी यांनी *मदर इंडिया*साठी लिहिलेलं होळीगीत सर्वाधिक आवडतं. अलीकडे मी स्वतः *नूरजहा* नावाच्या मालिकेसाठी लिहिलेल्या होळीगीताची प्रशंसा झालीय.

योगेश

गीतकार योगेश यांचं जन्म-शिक्षण लखनौतील तर कर्मभूमी मुंबई त्यामुळे आठवणींमध्ये पूर्व-पश्चिम असा संगम आहे. ते सांगतात की, 'माझे वडील मथुरेचे रहिवासी होते. मी मथुरेत अनेक वर्षं होळी खेळलो. मथुरा आणि वज्र की लठ्ठमार होळी प्रसिद्ध आहे. परंतु या होळीत मला कधीच रस वाटला नाही. कारण पाण्याच्या रंगापासून मी नेहमी दूर राहायचो. मला अबीर-गुलालाची होळीच अधिक आवडते. मुंबईत आल्यावर मी हीच परंपरा कायम ठेवली. नकली आणि घातक रंग आणि कृत्रिम बनणाऱ्या नातेसंबंधामुळे माझा होळीतील रस कमी झालाय. लोक रंग कमी चिखलफेक जास्त करतात. इतरांच्या तनाप्रमाणे मनावरही चिखलफेक होते. मनापासून खेळली जाणारी होळी दिसेनाशी होत चाललीय.

मी डझनभर होळीगीतं लिहिली असली तरी प्रामाणिकपणे सांगायचं तर मला माझ्यापेक्षा इतरांनी लिहिलेली होळीगीतं अधिक आवडतात.

वर्मा मलिक

वर्मा मलिक यांनी आजवर तीनशेहून अधिक होळीगीतं लिहिलीत. आर.के.ची होळी ते आजवर विसरलेले नाहीत. 'राज कपूर हा अतिशय उत्स्फूर्त माणूस होता. चित्रपटसृष्टीच्या बाहेरही असा माणूस मिळणे मुष्किल ते बंधूभाव आणि प्रेमाचे भोक्ते होते. सिनेसृष्टीतील सगळ्यांनी एकत्र येऊन रंगात न्हाऊन निघायचं या हेतूने त्यांनी होळी सुरू केली. या होळीत गरीब-श्रीमंत, हिंदू-मुसलमान असा भेदभाव नव्हता,' वर्मा मलिक सांगतात.